NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA-2.62)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## मा. विद्या परिषदेच्या ४२ व्या (तातडीच्या) बैठकीचा कार्यवृत्तांत
## शुक्रवार, दि.०४ सप्टेंबर, २०२० दुपारी १२:०० वा.



**मा. विद्या परिषदेची ४२ वी तातडीची बैठक शुक्रवार, दि.०४ सप्टेंबर, २०२० रोजी दुपारी १२:०० वा.** मा. कुलगुरुमहोदय यांच्या अध्यक्षतेखाली Google Meet Application द्वारे व्हिडीओ कॉन्फरन्सने आयोजित करण्यात आली होती.

Google Meet Application द्वारे व्हिडीओ कॉन्फरन्सने सहभाग घेतलेले सदस्य खालीलमाणे:

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | डॉ. मृणालिनी फडणवीस - मा. कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | डॉ. डी. एन. मिश्रा - प्र-कुलगुरु | सदस्य |
| ३) | प्राचार्य डॉ. व्ही. पी. उबाळे - प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा | सदस्य |
| ४) | डॉ. व्ही. एल. कदम - अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा | सदस्य |
| ५) | प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे - प्रभारी अधिष्ठाता, आंतर - विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा | सदस्य |
| ६) | डॉ. एस. आर. गेंगजे - प्रभारी सहयोगी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा | सदस्य |
| ७) | प्राचार्य डॉ. एस. के. पाटील, प्रभारी सहयोगी अधिष्ठाता वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा | सदस्य |
| ८) | प्राचार्य डॉ. एम. कृष्णमूर्ती - प्रभारी सहयोगी अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा | सदस्य |
| ९) | प्राचार्य डॉ. एस. एस. गणापूर, प्रभारी सहयोगी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा | सदस्य |
| १०) | प्राचार्य डॉ. एम. एस. कदम | सदस्य |
| ११) | डॉ. बी. पी. रोंगे | सदस्य |
| १२) | प्राचार्य डॉ. पी. आर. थोरात | सदस्य |
| १३) | प्राचार्य डॉ. डी. एस. तिकटे | सदस्य |
| १४) | डॉ. ए. एच. ननवरे | सदस्य |
| १५) | डॉ. एन. जी. शिंदे | सदस्य |
| १६) | डॉ. टी. एन. कोळेकर | सदस्य |
| १७) | डॉ. श्रीमती एस. आय. शेख | सदस्या |
| १८) | डॉ. व्ही. पी. शिखरे | सदस्य |
| १९) | श्री. पी. टी. पाटील | सदस्य |
| २०) | प्रा. एस. पी. माहुलीकर | सदस्य |

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| २१) | श्री. एस. जी. इंगळे | सदस्य |
| २२) | श्री. एस. एच. शहा - प्रभारी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | सदस्य |
| २३) | डॉ. कोथुर राघवेंदर राव | सदस्य |
| २४) | डॉ. टी. एन. लोखंडे | सदस्य |
| २५) | प्राचार्य डॉ. एस. ए. हलकुडे | सदस्य |
| २६) | डॉ. ए. एन. बारबोले | सदस्य |
| २७) | डॉ. डी. आर. गायकवाड | सदस्य |
| २८) | डॉ. श्रीमती ॲनी जॉन | सदस्या |
| २९) | डॉ. सी. एस. चव्हाण | सदस्य |
| ३०) | डॉ. बी. एच. दामजी | सदस्य |
| ३१) | प्रा. डॉ. व्ही. बी. घुटे - कुलसचिव | सदस्य सचिव |

**: निमंत्रित :**

| अ.क्र. | निमंत्रितांचे नाव |
|---|---|
| १) | डॉ. एस. एन. सलवदे |
| २) | प्राचार्य डॉ. ए. एल. देशमुख |
| ३) | डॉ. श्रीमती एन. सी. वाघमारे |

**स्वागत:**

मा. कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

सदर बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

**[ ०१ ] मा. कुलपती महोदय कार्यालय व मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिलेल्या सूचनेच्या अनुषंगाने प्रस्तुत विद्यापीठाच्या अंतिम वर्ष/सत्राच्या व इतर सर्व परीक्षा आयोजित करण्यासाठी, तसेच परीक्षेचे नियोजन करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: कोव्हिड-१९ या विषाणूच्या वाढत्या प्रार्दुभावामुळे उद्भवलेल्या परिस्थितीमध्ये, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे अंतिम सत्राच्या परीक्षा घ्यावयाच्या आहेत. याअनुषंगाने मा.कुलपती महोदय व मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या उपस्थितीत दि.०३/०९/२०२० रोजी सायंकाळी ०५.३० वा. राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठांच्या कुलगुरु समवेत संपन्न झालेल्या बैठकीमध्ये आदेशीत केल्यानुसार विद्या परिषदेची तातडीची बैठक दि.०४/०९/२०२० रोजी आयोजित केली होती.

सदर विद्या परिषदेच्या बैठकीमध्ये सर्व समावेशक चर्चा करुन सदस्यांची मते जाणून घेण्यात आली. त्यानुसार सर्व सदस्यांनी उपस्थित केलेल्या सूचना, शंकांचे मा.कुलगुरु, प्र-कुलगुरु व प्र.संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ यांनी निरसन करुन, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

| | |
|---|---|
| ठराव: | **मा. कुलपती महोदय यांच्या कार्यालयाने दिलेल्या सूचनेच्या अनुषंगाने विद्यापीठाच्या अंतिम वर्ष/सत्राच्या परीक्षांसोबत इतर सर्व परीक्षेचे खालीलप्रमाणे नियोजन करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**<br>१. सर्व अभ्यासक्रमाच्या सर्व वर्गाच्या नियमित, ATKT व Backlog परीक्षा ऑनलाईन पध्दतीने दि.०५ ऑक्टोंबर ते ३० ऑक्टोंबर, २०२० या कालावधीत घेण्याचे नियोजन करण्यात यावे.<br>२. सर्व अभ्यासक्रमाचे प्रश्न हे ५०/७० गुणांचे बहुपर्यायी स्वरुपाचे असतील व त्यांचे मुल्यमापन हे ऑनलाईन पध्दतीने करण्यात यावे.<br>३. प्रात्यक्षिक / तोंडी परीक्षा या विद्यापीठ संकुल व महाविद्यालयीन स्तरावर ऑनलाईन पध्दतीने घेण्यात याव्यात. यासंदर्भात कोणत्याही विद्यार्थ्यांस विद्यापीठ संकुलामध्ये / महाविद्यालयामध्ये बोलाविण्यात येऊ नये. तसेच प्रात्यक्षिक / तोंडी परीक्षेचे अंतर्गत व बहिस्थ मुल्यमापन करुन ते विद्यापीठाकडे सादर करावे.<br>४. कोव्हिड-१९ या विषाणूच्या वाढत्या प्रार्दुभावामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने अनुषंगिक दक्षता घेऊन ऑनलाईन परीक्षा न देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ऑफलाईन OMR Sheet पध्दतीद्वारे संबंधित परीक्षा घेण्यात याव्यात.<br>५. दिव्यांग विद्यार्थ्यांना त्यांच्या आवश्यकतेप्रमाणे पूर्ण सहायता देऊन ऑनलाईन अथवा ऑफलाईन पध्दतीने परीक्षा घेण्यात याव्यात. |

मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरू व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून बैठक संपल्याचे अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा यांनी जाहीर केले.

सही /-
कुलसचिव
(सदस्य सचिव, विद्या परिषद)

सही /-
मा. कुलगुरु
(अध्यक्ष, विद्या परिषद)